②

# महानगरपालिका अमरावती

## राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत पदभरती 2020-21

अमरावती महानगरपालिका, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत एकात्मीक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी महानगरपालिका अमरावती व्दारे खालिलप्रमाणे 11 महिने कालावधी करीता करार तत्वावर विहीत शैक्षणिक पात्रता धारण करण्याऱ्या व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

**पदांचा तपशील खालिलप्रमाणे**

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | सामाजिक आरक्षण | किमान शैक्षणिक अर्हता | वय मर्यादा | मासिक मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **अर्धवेळ वैद्यकिय अधिकारी** | 04 | लागू नाही | M.B.B.S. | 70 | रु.28000/- |

**अर्ज स्विकारण्याचे ठिकाण:-**

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान कक्ष, सार्वजनिक आरोग्य विभाग, महानगरपालिका अमरावती, राजकमल चौक अमरावती - 444601

**अटि व शर्ती :-**

1) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व अमरावती शहरात राहणारा असावा.
2) निवड झालेल्या उमेदवारास शहरी आरोग्य केंद्रावर आरोग्याच्या विविध उदिष्टांच्या संबंधित वैद्यकिय अधिकारी म्हणुन काम करावे लागेल.
3) राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत शहरी आरोग्य केंद्र (आरोग्यवर्धनी) येथे असंसर्गजन्य रोगा अंतर्गत ओ.पि.डी. काढणेय, औषधोपचार करणे, समुपदेशन करणे तसेच वेळोवेळी वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी आदेशीत केलेली कामे करणे बंधनकारक राहील.
4) अर्जावरील लिफाफ्यावर ज्या पदाकरीता अर्ज करीत आहात त्या पदाचा स्पष्ट उल्लेख असावा.
5) अर्ज दि.03/02/20 पासून ते दि. 11/02/20 पर्यंत कार्यालयीन दिवशी (सोमवार ते शुक्रवार) कार्यालयीन वेळेत (सकाळी 9.45 ते सायंकाळी 6.15) स्विकारण्यात येईल. तसेच अर्ज पोस्टाने पाठवित असल्यास विहीत वेळेत कार्यालयास पोहचलेल्या अर्जाचाच विचार करण्यात येईल अर्ज उशिराने पोहचल्यास व आपला अर्ज ग्राह्य न धरल्यास संस्था जबाबदार राहणार नाही.
6) अर्जामधील माहिती ही परिपुर्ण भरावी व त्या अनुशंगाने सर्व शैक्षणिक प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, उमेदवारांचा पासपोर्ट साईज कलर फोटो, ओळखपत्र इत्यादी सर्व कागदपत्रे अर्जासोबत जोडण्यात यावे. विहीत केलेल्या अर्हतेचे कागदपत्र अपुर्ण असल्यास सदर उमेदवारांचा अर्ज अपात्र करण्यात येईल व त्याबाबत कोणतेही निवेदन विचारात घेतले जाणार नाही.
7) अर्धवेळ वैद्यकिय अधिकारी पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी MBBS अंतिम वर्षाची गुणपत्रिका, महाराष्ट्र मेडिकल कॉन्सीलचे रजिस्ट्रेशन/नोंदणी/नुतणीकरण प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे.
8) अनुभवाच्या बाबतीत शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणारा कामाचा अनुभव ग्राह्य धरला जाईल.
9) सदरची पदे ही राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ची निव्वळ तातपुरत्या स्वरुपाची कंत्राटी तत्वावरील असल्याने सदर पदांचा महानगरपालिकेशी काहिही संबंध नाही. करीता निवड होणाऱ्या उमेदवारास अमरावती महानगरपालिका आस्थापनेवर हक्क सांगणे तसेच कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

Scanned by CamScanner

10)निवड झालेल्या उमेदवारास कमीत कमी 11 महिन्यांचा करारनामा करावा लागेल आणि 11 महिन्यांचा करार कालावधी संपल्यानंतर उमेदवाराने केलेल्या कामाचे अवलोकन करुन पुनर्नियुक्ती देण्यात येईल. रुजू झाल्यानंतर 11 महिन्याचा कालावधी समाप्त होण्याआधि राजीनामा देता येणार नाही. तसेच नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवारांचे काम समाधानकारक न आढळल्यास तसेच कोणत्याही प्रकारचे गैरवर्तवणुक केल्यास कोणतेही कारण न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल.

11)उमेदवाराने कोणत्याही प्रकारचा राजकिय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.

12)निवड/नियुक्ती/पुनर्नियुक्ती तसेच सदरच्या प्रक्रियेमध्ये बदल करणे अथवा रद्द करण्याचे अंतिम अधिकारी मा.आयुक्त तथा अध्यक्ष, एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, राष्ट्रीय आरोग्य अभियान महानगरपालिका अमरावती यांनी राखुन ठेवलेला आहे.

13)सदरची जाहिरात अमरावती महानगरपालिका नोटीस बोर्ड आणि अमरावती महानगरपालिकेच्या www.amt-corp-org या वेबसाईट वर उपलब्ध करण्यात आलेली आहे.

14)मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र, मुंबई यांचे पत्र जा.क्र.राआसो/NUHM/स्टाफ मार्गदर्शन/14981-1-2013-14 दि.05 जून 2018 च्या पत्रान्वये खालिलप्रमाणे निवड करण्यात येईल.

15)एकुण मुखाखात 100 गुणांची राहील

अ) यामध्ये पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या गुणानुसार जास्तीत जास्त 80 गुण देण्यात येईल.

आ) पदवीच्या शेवटच्या वर्षाचे गुण ग्राह्य धरले जाईल

इ) पदव्युत्तर पदविका असल्यास अतिरिक्त जास्तीत जास्त 5 गुण देण्यात येईल

ई) 5 गुण अनुभवास आधारित राहील. दोन वर्षपेक्षा कमी अनुभव असल्यास 0 गुण, 2 वर्षे अनुभव असल्यास 3 गुण आणि पुढे प्रत्येक वर्षासाठी 1 याप्रमाणे जास्तीत जास्त 5 गुण राहतील.

उ) 10 गुण विषय ज्ञानासाठी (मुलाखतीसाठी) देण्यात येतील.

16) उच्च शैक्षणिक अहर्ताधारकास व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल

17) पात्र उमेदवार व प्रतिक्षा यादीवरील उमेदवार यांची यादी फलकावर प्रसिध्द करण्यात येईल व त्याप्रमाणे नियुक्ती आदेश देण्यात येतील.

18) नियुक्त झालेल्या उमेदवारास कामावर रुजू होताना विहित नमुन्यामध्ये रु.100/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.

21-01-2021

| वैद्यकिय आरोग्य अधिकारी तथा | उपायुक्त (सा.) तथा | आयुक्त तथा |
|---|---|---|
| सदस्य सचिव | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

Scanned by CamScanner